# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये जी-२० परिषदेच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन सोमवार, दिनांक १६/०१/२०२३ रोजी दुपारी २.०० वाजेपासून सायंकाळी उशिरापर्यंत करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाला अति महत्वाच्या व्यक्ती उपस्थित राहणार असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

१. विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागांची कामकाजाची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत राहील.

२. शैक्षणिक विभागांनी आवश्यकतेनुसार ऑनलाईन पद्धतीने शैक्षणिक कामकाज सुरु ठेवावे.

३. मुख्य प्रवेशद्वार ते जयकर ग्रंथालय मार्गे मुख्य इमारत हा रस्ता वाहतूकीसाठी बंद करण्यात आलेला असल्याने इतर पर्यायी मार्गांचा वापर करावा.

४. सोमवार, दिनांक १६/०१/२०२३ रोजी सर्व प्रवेशद्वारातून ओळखपत्र दाखवूनच प्रवेश दिला जाईल तसेच अभ्यागतांना प्रवेश वर्जित आहे.

५. विद्यापीठ आवारात वास्तव्यास असणाऱ्या सर्वांनी जनरल जोशी प्रवेशद्वाराचा वापर करावा.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र. एएन/ 210 )
दिनांक : 14 JAN 2023 )

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग

यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.